Jagdamba Education Society's

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

Accredited by

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 21/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## लोकसंस्कृती, लोकसाहित्याचे संशोधक रा.चिं.ढेरे



रामचंद्र चिंतामण ढेरे हे महाराष्ट्रातील धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, लोकसंस्कृती, लोकसाहित्य, संतसाहित्य आणि काव्यशास्त्र याविषयी संशोधन करणारे व्रतस्थ संशोधक, अभ्यासक, लेखक आणि संपादक म्हणून ओळखले जात. महाराष्ट्राच्या धर्मेतिहासाचा सखोल, सूक्ष्म आणि सर्वांगीण अभ्यास प्रातिभ बुद्धीने करणारा संशोधक म्हणून देश-विदेशातील संशोधकांत रा. चिं. ढेरे यांची ओळख आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या भाष्यकारांपैकी एक म्हणूनही त्यांची ओळख आहे. महाराष्ट्राच्या धर्मजीवनाचा, समाजधारणांचा आणि सांस्कृतिक इतिहासाचा त्यांनी खोलवर शोध घेऊन त्याचा नवा अन्वय लावला आहे.

रा. चिं. ढेरे यांचा जन्म महाराष्ट्रातील मावळ भागातील निगडे या गावी २१ जुलै १९३० रोजी झाला. त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांचे वडील चिंतामण गंगाधर ढेरे यांचे उर्से धामणे या गावी निधन झाले. पुढे पुण्यात आल्यावर मात्र एकाच वर्षात दोन-दोन इयत्ता उत्तीर्ण होत, रात्रशाळेत शिकत १९५० साली रा.चिं. ढेरे मॅट्रिक झाले. जन्मापासून संकटांनी ढेरे यांचा पाठलागच सुरू केलेला होता. आप्तजन व जिवलगांचे मृत्यू, दारिद्र्य आणि दीर्घ आजार या साऱ्या आपत्तींना तोंड देत त्यांनी त्या वेळी सुरू केलेला ज्ञानयज्ञ शेवटच्या श्वासापर्यंत सुरू ठेवला. कधी टी डेपोत, कधी पुठ्ठ्यांची खोकी बनवणाऱ्या कारखान्यात, कधी छापखान्यात मुद्रितशोधक म्हणून, तर कधी विद्यालयात ग्रंथपाल म्हणून काम करीत ते शिकत राहिले. जी छोटीशी नोकरी होती, तीही १९५९ साली सोडली आणि लेखनोपजीवी बनण्याची प्रतिज्ञाच त्यांनी केली.

कोणतेही आर्थिक सहाय्य नाही. दहा-बाय दहाच्या एका छोट्या खोलीत, जेथे बारा महिने ओल असते, अशा खोलीत त्यांचा संसार होता. सगळ्या प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष चालू असतानाच पानशेतच्या पुरात सगळे वाहून गेले. जवळजवळ पाच हजार ग्रंथांचा संग्रह, लेखनासाठी जमा केलेले संदर्भ-साधने, टिपणे वाहून गेली. या परिस्थितीतही विचलित न होता, त्यांनी पुन्हा नवे आयुष्य सुरू केले. थोर बुद्धिजीवी संशोधक असलेल्या रा.चिं. ढेरे यांचे १ जुलै २०१६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jul 21, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

Jagdamba Education Society's SND POLYTECHNIC KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401